सोबत उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे "अन्न सुरक्षा मानदे अधिनियम २००६ ची प्रभावी अंमलबजावणी होणेबाबत." या विषयाचे शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-१११(प्र.क्र.२०/१८)/समन्वय, दिनांक ४.५.२०१८ ची प्रत सोबत जोडत आहे.

---

क्रमांक : १६/संकीर्ण/२०१८/शा१२७७
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३ महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. १९६७,
मुंबई ४०० ००१.

दिनांक : 18 MAY 2018

प्रति,

१) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.
२) संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई
यांना कळविण्यांत येते की, त्यांनी त्यांचे अधिपत्याखालील सर्व संस्था / कार्यालये यामधील संबंधितांच्या निदर्शनास आणावे व पुढील कार्यवाही करावी.

( प्रमोद नाईक )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

4695

**महत्वाचे**

पृष्ठांकन क्र.विकाऔ/शिक्षण/२०१८/१०७७
दिनांक :- 4 JUN 2018

या कार्यालयाच्या अधिनस्त येत असलेल्या पदविका/पदवी व पदव्युत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था प्रमुखांना सुचित करण्यात येते की, आपल्या संस्थेच्या आवारातील उपहारगृहे यांना **"अन्न सुरक्षा मानदे अधिनियम २००६ ची प्रभावी अंमलबजावणी होणेबाबत"** सोबत जोडलेल्या शासन परिपत्रकातील आदेशानुसार अंमलबजावणी करुन तसा अहवाल सादर करावा.

सोबत- शासन परिपत्रक.

प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत :- या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना प्रत देण्यात येवून सुचित करण्यात येते की, सदरील पत्र या कार्यालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.

सोबत उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे **"अन्न सुरक्षा मानदे अधिनियम २००६ ची प्रभावी अंमलबजावणी होणेबाबत."** या विषयाचे शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-१११९(प्र.क्र.२०/१८)/समन्वय, दिनांक ४.५.२०१८ ची प्रत सोबत जोडत आहे.

—·—·—·—·—·—·—

**क्रमांक : १६/संकीर्ण/२०१८/शा१२७७**
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३ महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. १९६७,
मुंबई ४०० ००१.

**दिनांक :** 18 MAY 2018

**प्रति,**

**१) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.**
**२) संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई**
**यांना कळविण्यांत येते की, त्यांनी त्यांचे अधिपत्याखालील सर्व संस्था / कार्यालये यामधील संबंधितांच्या निदर्शनास आणावे व पुढील कार्यवाही करावी.**

( प्रमोद नाईक )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

4695
23 MAY 2018

अन्न सुरक्षा मानदे अधिनियम २००६ ची
प्रभावी अंमलबजावणी होणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण - १११९/(प्र.क्र.२०/१८)/समन्वय
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
तारीख: ०४ मे, २०१८.

शासन परिपत्रक -

अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य हे अन्न सुरक्षा मानदे कायद्याची अंमलबजावणी करते व सदर कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने राज्यपातळीवर मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आलेली आहे. अन्न सुरक्षा व मानदे अधिनियम अंतर्गत राज्यस्तरिय समितीची बैठक दि.११.९.२०१७ रोजी मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. सदर बैठकीचे इतिवृत्तानुसार महाविद्यालयातील आवारातील उपहारगृहे यांना अन्न सुरक्षा मानदे कायदा २००६ अंतर्गत कलम ३१ नुसार परवाने/नोंदणी घेणे आवश्यक आहे.

२. अन्न सुरक्षा मानदे कायदा २००६, नियम व नियमन २०११ चे कलम ३१ (१) व (२) नुसार प्रत्येक अन्न व्यावसायिकांने अन्न पदार्थ उत्पादन, साठवण, वितरण, वाहतूक व विक्री यासाठी अन्न परवाना तथा नोंदणी करणे बंधनकारक आहे. त्यानुसार प्रत्येक अन्न व्यावसायिकांने अन्न सुरक्षा व मानदे कायद्यांतर्गत परवाना नोंदणी घेणे आवश्यक आहे. आपल्या अधिपत्याखाली येणा-या महाविद्यालये/विद्यापीठ/शैक्षणीक संस्था यांच्या आवारातील उपहारगृहे यांनी अद्यापपर्यन्त परवाना अथवा नोंदणी घेतलेली नसेल त्यांना परवाना व नोंदणी घेण्यासाठी बंधनकारक करावे व त्याबाबतचा अनुपाल अहवाल शासनास सादर करण्यात यावा.

३. परवाना व नोंदणी (foodlicensing.fssai.gov.in) या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने करावयाची आहे. ज्या अन्न व्यावसायिकांची वार्षिक उलाढाल रु.१२ लाखापेक्षा कमी आहे त्यांनी नोंदणीसाठी ऑनलाईन फॉर्म बी भरावा. (वार्षिक शुल्क रु.१००/-) व वार्षिक उलाढाल रु.१२ लाखापेक्षा जास्त आहे त्यांनी परवान्यासाठी ऑनलाईन फॉर्म बी भरावा. (वार्षिक शुल्क रु.२०००/- उत्पादकास रु.३०००/-) याबाबत काही अडचण आल्यास अन्न व औषध प्रशासनाच्या संबंधित जिल्हा कार्यालयास (सहायक आयुक्त, अन्न) संपर्क साधावा. अथवा टोल फ्री क्रमांक १८००२२२३६५ वर संपर्क साधावा.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१८०५०५१३३२१३८३०८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( सिद्धार्थ खरात )
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.मंत्री ( उच्च व तंत्र शिक्षण ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.राज्यमंत्री ( उच्च व तंत्र शिक्षण ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.विरोधीपक्ष नेता (विधानसभा/विधानपरिषद) विधान भवन, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव, (उच्च व तंत्र शिक्षण विभाग ) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
८. आयुक्त, अन्न आणि औषध प्रशासन ( म. रा. ),सव्हे नं.३४१, बांद्र-कुर्ला संकुल, मुंबई.
९. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
११. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१२. संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१३. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे.
१४.निवडनस्ती.